## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांचेकडून दि. १२/०९/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६२/२०११/जा.७४४, दि. १५/०९/२०११ व २२/०९/२०११.

३) हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., माहूल, मुंबई यांचे दिनांक १५/०९/२०११ रोजीचे पत्र.

४) सहाय्यक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांचे दिनांक १७/०९/२०११ रोजीचे पत्र.

५) सहाय्यक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांचे दिनांक २३/०९/२०११ रोजीचे अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६२/२०११/जा. ८९०.
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक १२ /१०/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ११/०९/२०११ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथील अधिकारी पथक हे बंदर परिमंडळ विभागात गस्त घालत असताना सपोनि गोपाळे यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, माहूल गाव ते मुंबई पोर्ट ट्रस्ट या रस्त्याचे किनाऱ्यालगत एच.पी.सी.एल. व बी.पी.सी.एल. या पेट्रोलियम कंपन्यांची तेल वाहून नेण्याऱ्या मोठ्या पाईपलाईनला काही इसम भोक पाडून त्याठिकाणी चोरीने ऑईल कॅनमध्ये भरुन सदरचे ऑईलने भरलेले कॅन एक टेम्पोमध्ये भरीत असल्याचे सांगितले.

सदर बातमीच्या अनुषंगाने पोलिस पथकाने बी.पी.टी माहुल रोडने आर.सी.एफ. च्या दिशेने जात असताना साधारण ५:३० वाजताच्या सुमारास बी.पी.टी. माहुल रोड टोलनाक्याच्या पुढे अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या पुलाजवळ महेंद्रा ॲण्ड महेंद्रा कंपनीचा मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ मधील काही इसम हे बी.पी.सी. पाईपलाईनमधून तेल चोरी करीत असल्याचे आढळले. त्यानुसार त्यांचे पोलिस पथक सदर ठिकाणी मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ हा संशयीतरित्या स्थितीत त्यांना थांबलेला आढळून आला. म्हणून त्यांनी पाहणी केली असता, काही इसम हे सदर पुलाजवळ असलेल्या तेल वाहतूक करण्याऱ्या पाईपलाईनजवळून प्लॅस्टिकचे तेलाने भरलेले ड्रम सदर टेम्पोमध्ये भरताना दिसून आले. म्हणून सदर इसमांना हटकले असता, पाईपलाईनच्या खाली असलेले दोन इसम हे पुलाखालून नाल्यातून पळून गेले. तर पुढील नमूद इसम नामे १) योगेश ब्रिजभुषण यादव (टेम्पो चालक), २) शिवा बसप्पा गौडा ३) महमद ईलीयास महमद खुर्शीद शेख ४) अमिन नजरुल इस्लाम मंडल ५) मोहम्मद मुझफर मोहमद खलील मिस्त्री उर्फ सोहेल यांना जागेवरच ताब्यात घेतले.

सदर ताब्यात घेतलेल्या इसमांकडे चौकशी केली असता, ते व त्यांचा पळून गेलेला साथीदार मेहताब व मोईन हे बी.पी.सी.एल. च्या तेल वाहतूक करणाऱ्या पाईपलाईनमधून तेल चोरी करुन सदर ड्रममध्ये भरुन विक्रीसाठी नेत असल्याचे सांगितले. त्यानंतर तात्काळ पोलिस पथकाने पंचासमक्ष मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ ची झडती घेतली असता, सदर टेम्पोमध्ये काळ्या, निळ्या, सफेद रंगाचे एकूण ३९ प्लॅस्टिक कॅन तेलाने भरलेले आढळून आले. सदर तेलाची पहाणी केली असता, प्रत्येक ड्रममध्ये ३५ लिटर सफेद तेल आढळून आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी संगनमत करुन बी.पी.सी.एल. कंपनीच्या तेल वाहून नेण्याऱ्या पाईपलाईनमधून तेलाची चोरी केली. तसेच अत्यावश्यक वस्तू कायद्याचा भंग करुन त्यांचे ताब्यात घातक ज्वलनशिल तेलाचा पदार्थ निष्काळजीपणे विक्रीसाठी ताब्यात बाळगल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ तसेच भा. द. वि. चे कलम ३७९, २८५, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथील अधिकाऱ्यांनी प्रथम वडाळा पोलिस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १५१/२०११, दि.११/०९/२०११ तद्नंतर गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ७५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ | १ नग | २,००,०००/- |
| २ | ३५ लिटर क्षमतेचे ३९ तेलाचे ड्रम | १३६५ लिटर | १,१७,०००/- |
| | | एकूण | ३,१७,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून वडाळा पोलिस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १५१/२०११, दि.११/०९/२०११ (गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ७५/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.२०/०९/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०९/२०११ रोजीच्या सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली व पुढील सुनावणी दिनांक ११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

तथापी, सहाय्यक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांनी वाचावे क्र. ५ अन्वये सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपी हे दिनांक २०/०९/२०११ पासून न्यायालयीन कोठडीत आहेत. नमुद आरोपीचा वडाळा पोलीस ठाणे व आर.सी.एफ. पोलीस ठाणे यांचेकडे अशाच प्रकारच्या उघडकीस न आलेल्या गुन्ह्यामध्ये पोलीस तपासासाठी ताबा घेण्याची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे आरोपी हे जामीनावर सुटल्याशिवाय सुनावणीकरीता उपस्थित राहू शकत नाही. सदर दोन्ही पोलीस ठाण्याकडे त्यांचा ताबा घेणार असल्याने नमूद आरोपी लवकर जामीनावर सुटण्याची शक्यता नाही. त्यामुळे मुद्देमाल विल्हेवाट संबंधीची प्रक्रीया लवकर पूर्ण होणेची शक्यता दिसून येत नाही. तसेच सदरचा जप्त मुद्देमाल पोलीस आयूक्त कार्यालयाचे आवारात असून, या कार्यालयात नवीन इमारत बांधकामाचे काम चालू असल्याने जप्त मुद्देमालास हानी पोहोचण्याची शक्यता असून, हा द्रवपदार्थ ज्वालाग्राही असल्याने पोलीस आयुक्त कार्यालयातील आवारात आग लागण्याचा धोका निर्माण होवू शकतो. तरी सुनावणीच्या निकालाच्या अधिन राहून एच.पी.सी.एल. कंपनीकडून मुद्देमाल सुरक्षित ठेवण्याचे बंधपत्र व हमीपत्र घेवून सदरचा माल त्यांच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्याकरीता देण्याबाबत विचार होणेस विनंती केली आहे.

सबब, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांनी केलेल्या विनंतीनुसार प्रकरण जप्त मुद्देमाल विल्हेवाटीच्या निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
AI

युक्तीवाद :-

सदर गुन्ह्यातील आरोपी हे न्यायालयीन कोठडीत असल्याने सुनावणीकरीता उपस्थित राहू शकत नसल्याचे पोलीसांनी अभिवेदन सादर केले आहे.

तसेच हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., माहूल, मुंबईचे डेप्यूटी जनरल मॅनेजर श्री व्ही. व्ही. क्रिष्णम राजू यांनी दिनांक १५/०९/२०११ रोजी सादर केलेल्या पत्रात, सदर तेल कंपनीच्या पाईप लाईन मधून प्लॅस्टिक पाईपद्धारे ल्यूब ऑईलची चोरी करतांना गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई येथील अधिकाऱ्यांनी पकडून ३९ कॅन ल्यूब ऑईल व टेम्पो जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे. सदर जप्त ल्यूब ऑईल मधील १ लिटरचे नमूने पृथःकरणासाठी पाठविले असता, त्याचा ट्रॉम्बे स्टेशन व माझगांव स्टेशन येथील अहवाल ल्युब ऑईल असा आलेला असून तो एच.पी.सी.एल. कंपनीचा आहे. तसा लॅबोरेटरी टेस्ट रिपोर्ट जोडला आहे. तरी जप्त केलेला १३६५ लिटर ल्युब ऑईलचा साठा सुरक्षित ठेवण्याकरीता तेल कंपनीच्या ताब्यात देण्याबाबत विनंती केली आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील, सहाय्यक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी पुढील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ११/०९/२०११ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथील अधिकारी पथकांना मिळालेल्या बातमीनुसार तेथील पोलिस पथकाने बी.पी.टी माहुल रोडने आर.सी.एफ. च्या दिशेने जात असताना साधारण ५:३० वाजताच्या सुमारास बी.पी.टी. माहुल रोड टोलनाक्याच्या पुढे अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या पुलाजवळ महेंद्रा ॲण्ड महेंद्रा कंपनीचा मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ मधील काही इसम हे बी.पी.सी. पाईपलाईनमधून तेल चोरी करीत असल्याचे आढळले. त्यानुसार त्यांचे पोलिस पथक सदर ठिकाणी मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ हा संशयीतरित्या स्थितीत त्यांना थांबलेला आढळून आला. म्हणून त्यांनी पाहणी केली असता, काही इसम हे सदर पुलाजवळ असलेल्या तेल वाहतूक करणाऱ्या पाईपलाईनजवळून प्लॅस्टिकचे तेलाने भरलेले ड्रम सदर टेम्पोमध्ये भरताना दिसून आले. तसेच पाईपलाईनच्या खाली असलेले दोन इसम हे पुलाखालून नाल्यातून पळून गेले व चार इसमांना जागेवरच ताब्यात घेतले. सदर ताब्यात घेतलेल्या इसमांकडे चौकशी केली असता, ते व त्यांचा पळून गेलेले इसम हे बी.पी.सी.एल. च्या तेल वाहतूक करणाऱ्या पाईपलाईनमधून तेल चोरी

करुन सदर ड्रममध्ये भरुन विक्रीसाठी नेत असल्याचे सांगितले. त्यानंतर तात्काळ पोलिस पथकाने पंचासमक्ष मोटार टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ ची झडती घेतली असता, सदर टेम्पोमध्ये काळ्या, निळ्या, सफेद रंगाचे एकूण ३९ प्लॅस्टिक कॅन तेलाने भरलेले आढळून आले. सदर तेलाची पहाणी केली असता, प्रत्येक ड्रममध्ये ३५ लिटर सफेद तेल आढळून आले. यावरुन सदरचा टेम्पो व टेम्पोमधील कॅनमध्ये भरलेला तेलाचा साठा जप्त करण्यात आला.

हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., माहूल, मुंबईचे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री व्ही. व्ही. क्रिष्णम राजू यांनी दिनांक १५/०९/२०११ रोजी सादर केलेल्या पत्रात, सदर तेल कंपनीच्या पाईप लाईन मधून प्लॅस्टिक पाईपद्वारे ल्यूब ऑईलची चोरी करतांना गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई येथील अधिकाऱ्यांनी पकडून ३९ कॅन ल्यूब ऑईल व टेम्पो जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे. सदर जप्त ल्यूब ऑईल मधील १ लिटरचे नमूने पृथ:करणासाठी पाठविले असता, त्याचा ट्रॉम्बे स्टेशन व माझगांव स्टेशन येथील अहवाल ल्युब ऑईल असा आलेला असून तो एच.पी.सी.एल. कंपनीचा आहे. तसा लॅबोरेटरी टेस्ट रिपोर्ट जोडला आहे. तरी जप्त केलेला १३६५ लिटर ल्युब ऑईलचा साठा सुरक्षित ठेवण्याकरीता तेल कंपनीच्या ताब्यात देण्याबाबत विनंती केली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी सादर केलेल्या दिनांक २३/०९/२०११ रोजीच्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपी हे दिनांक २०/०९/२०११ पासून न्यायालयीन कोठडीत असून, सदर आरोपींचा वडाळा पोलीस ठाणे व आर.सी.एफ. पोलीस ठाणे यांचेकडे अशाच प्रकारच्या उघडकीस न आलेल्या गुन्ह्यामध्ये पोलीस तपासासाठी ताबा घेण्याची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे आरोपी हे जामीनावर सुटल्याशिवाय सुनावणीकरीता उपस्थित राहू शकत नाही. सदर दोन्ही पोलीस ठाण्याकडे त्यांचा ताबा घेणार असल्याने नमूद आरोपी लवकर जामीनावर सुटण्याची शक्यता नाही. तसेच सदरचा जप्त मुद्देमाल पोलीस आयूक्त कार्यालयाचे आवारात असून, या कार्यालयात नवीन इमारत बांधकामाचे काम चालू असल्याने जप्त मुद्देमालास हानी पोहोचण्याची शक्यता असून, हा द्रवपदार्थ ज्वालाग्राही असल्याने पोलीस आयुक्त कार्यालयातील आवारात आग लागण्याचा धोका निर्माण होवू शकतो. तरी सुनावणीच्या निकालाच्या अधिन राहून एच.पी.सी.एल. कंपनीकडून मुद्देमाल सुरक्षित ठेवण्याचे बंधपत्र व हमीपत्र घेवून सदरचा माल त्यांच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्याकरीता देण्याबाबत विचार होणेस विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी घटनास्थळी ताब्यात घेतलेल्या आरोपीकडे पोलीसांनी विचारणा केली असता, शासकीय तेल कंपनीतील पाईप लाईनमधून तेलाची चोरी केली असल्याचे मान्य केले असून, घटनास्थळी जप्त केलेल्या टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ मध्ये सदर चोरी केलेल्या तेलाने भरलेले ३९ प्लास्टीक कॅन आढळून आले आहे. यावरुन आरोपी यांनी संगणमत करुन शासकीय तेल कंपनीतील पाईप

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE

0006 लाईनद्वारे जाणाऱ्या द्रवपदार्थाच्या साठ्याची जाणीव पुर्वक व स्वतःच्या फायद्यासाठी काळ्याबाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने त्याची पाईप लाईनमधून चोरी केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून, सदर चोरी केलेल्या तेलाची बेंकायदेशीररित्या वाहतूक करण्यासाठी जप्त टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ चा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वडाळा पोलिस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १५१/२०११, दि.११/०९/२०११ (गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ७५/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) जप्त करण्यात आलेल्या ३९ प्लास्टीक कॅनमधील संपुर्ण एकूण १३६५ लिटर्स द्रवपदार्थाचा साठा हा संबंधीत हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., माहूल, मुंबई यांचे ताब्यात देण्यात यावा. तथापी, सदरचा साठा हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीला देण्यापुर्वी या साठ्याच्या सुरक्षीततेबाबत तेल कंपनीकडून हमीपत्र व सदर साठ्याच्या रकमेएवढ्या किमतीचे बंधपत्र घेण्यात यावे.

२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टेम्पोच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखावरुन पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास सदर टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

३) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले ३५ लिटर क्षमतेचे ३९ रिकामे कॅन इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) योगेश ब्रिजभुषण यादव, टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ चा चालक
२) शिवा बसप्पा गौडा
३) महमद ईलीयास महमद खुर्शीद शेख
४) अमिन नजरुल इस्लाम मंडल
५) मोहम्मद मुझफर मोहमद खलील मिस्त्री उर्फ सोहेल
६) मेहताब
७) मोईन
८) टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-१८२९ चा मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुप्रशा, गु.अ.वि., मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) सहाय्यक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) डीजीएम-ओपीएनएस, एमपीएसपीएल, मे हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., माहूल, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

E:\Ammaldata\Ammal Aadesh\Aadesh.doc